**शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या “हातमागावरील कापडाची” दरनिश्चितीस मुदतवाढ**

## महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय

नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई- ४०० ०३२

आदेश क्रमांक: भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती मुदतवाढ/( १८ )/२०१५-१६/ दिनांक:- 30 JAN 2016

वाचा:
1. १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/उद्योग-४, दिनांक ३०.१०.२०१५
2. २)उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र.भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती/३८/२०१२-१३/बी-१३५३९, दि.१५ सप्टेंबर, २०१२
3. ३) शासनाने पत्र क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८३/उद्योग-४ दि.२७.०१.२०१६

उद्योग संचालनालयाने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ (महाटेक्स) यांनी शासकीय विभागांना लागणाऱ्या हातमागावरील कापडाच्या पुरवठयासाठी उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दरनिश्चिती करण्यात आली होती.

शासनाने खालील वस्तूंच्या सन २०१२-१३ च्या दरनिश्चितीमध्ये कोणतीही वाढ न करता दि.३१.०३.२०१६ किंवा सदरच्या वस्तूची नव्याने दरनिश्चिती होईपर्यंत यापैकी जे अगोदर असेल तोपर्यंत दरनिश्चितीस मुदतवाढ देण्यात येत आहे.

| मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट “अ” मधील अ.क्र. | कापडाचे प्रकार |
|---|---|
| १<br>(अ ते इ) | कॉटन साडी<br>(अ, ब, क, ड व इ) |
| २ | शर्टिंग<br>(अ, ब, क) |
| ३<br>(अ, ब) | टॉवेल<br>(फक्त अ व ब) |
| ४ | बेडशीट<br>(अ, ब, क) |
| ६ | चादर<br>(१ ते ३) |
| ७ | दरी, सतरंजी, बस्कर पट्टी/डयुरेट-<br>(१ ते ५) |
| ९ | युनिफॉर्म क्लॉथ<br>(१ ते ४)<br>हॉस्पीटल क्लॉथ<br>(६ प्रकार) |

| | |
|---|---|
| १० | अ) वुलन क्लॉथ (१ ते ३)<br>ब) हॉस्पीटल ब्लँकेट (१ व २) |
| ११ | बेडशीट (अ, ब) |

या दरनिश्चिती मुदतवाढीस संदर्भ क्र. (२) मधील सर्व अटीसह खालील अटी लागू राहतील.

१) सन २०१२-१३ ला ज्या Specifications च्या वस्तू हातमाग महामंडळ/महाटेक्स यांना दरनिश्चिती करुन देण्यात आले आहे. त्याच Specifications च्या वस्तू खरेदीदार विभागाला पुरविण्याची जबाबदारी हातमाग महामंडळ/महासंघ यांची राहील.

२) सदरच्या वस्तू केंद शासनाच्या हातमाग आरक्षण कायदा, १९८५ व त्यापुढील सुधारणा दि.२६ जुलै, १९९६ मधील तरतुदीनुसार असल्याची जबाबदारी हातमाग महामंडळ/महाटेक्स यांची राहील.

उद्योग सह संचालक (भां.ख.)
विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता

प्रति,

१) महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., दि पंतनगर गार्डन व्हयू को.-ऑप हौसिंग सोसायटी लि.,"शशांक" २२५/५९५८, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.

२) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., एमएसएचसी कॉम्प्लेक्स, उमरेर रोड, नागपूर-४४० ००९.

३) सह सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

~~४)~~ उप सचिव (उद्योग-४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५) उप सचिव, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.